महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २५ वे दिनांक : १३/०१/२०२६ वार : मंगळवार

## एक औरंगजेब आम्हाला महाग पडला, आमचे शहर गोदाम नाही -शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** 'यह शहर इतना प्यारा है, मेरा इंतकाल हुआ तो मुझे यही दफना दो,' असे वक्तव्य एमआयएमचे नेते, खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी आमखास मैदानावरील सभेत केले होते.

त्याला पालकमंत्री संजय शिरसाट यांनी प्रत्युत्तर दिले आहे. 'एक औरंगजेब आम्हाला महाग पडला. त्याने तसेच केले. नगरला मेला आणि इथे आला. आमचे शहर काही गोदाम आहे का? तिकडे जागा नाही का? अशा भावनिक वक्तव्यामुळे समाजात हालचाल निर्माण होते,' असे शिरसाट यांनी 'दिव्य मराठी'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले.

भाषणात नेते भावनिक स्टेटमेंट करतात. त्यामुळे लोकांना वाटते 'क्या बडा आदमी है. यहा दफन होना चाहता है.' त्या माध्यमातून भावनिक वातावरण तयार करतात. भावनिक वक्तव्यामुळे समाजात हालचाल होते. त्यातून दंगली घडू शकतात, हे मी बोललो होतो. लोकांनी सावध राहण्याची गरज असल्याचे सांगितले होते, ही बाबही शिरसाट यांनी नमूद केली.

पक्षातील अंतर्गत संघर्षाबाबत विचारले असता, 'आमच्यात वाद नाही. हे जिवंतपणाचे लक्षण आहे. नेतृत्वात पुढे जाण्याची स्पर्धा म्हणजे वाद नाही. आम्ही एकत्र आहोत. तिकीट कापल्याचे काहींना वाईट वाटले. सर्वांशी चर्चा केली. आता काही वाद नाही, असे त्यांनी सांगितले.

दंगलीबाबत शिरसाट म्हणाले की, या शहरात काहीही घडू शकते. हे शहर संवेदनशील आहे. शहागंजमध्ये दगडफेक झाली, तर दुसरीकडे अफवा येते की दोन लोक मेले. अशा अफवा पसरवल्या जातात. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने वागले पाहिजे, शांतता बाळगली पाहिजे.

## कफन चोरांना जेलमध्ये टाकून मुंबईत सत्ता स्थापन करणार- फडणवीस



**मुंबई :** आज मुंबईतील शिवाजी पार्कवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा पार पडली. या सभेत ठाकरे बंधूंच्या कालच्या सभेवर जोरदार पलटवार केल्याचे पाहायला मिळाले. देवेंद्र फडणवीस यांनी अदानीच्या मुद्द्यावरून गौतम अदानी यांची जिथे भाजपचे सरकार नाही या राज्यांमध्ये किती गुंतवणूक आहे, याची देखील आकडेवारी दाखवली. तसेच ठाकरेंवर टीका करताना फडणवीस म्हणाले, या कफन चोरांना जेलमध्ये टाकून मुंबईत सत्ता स्थापन करणार, असा इशारा देखील दिला.

मराठी माणसाच्या अस्तित्वाची नाही तर त्यांच्या अस्तित्वाची लढाई. आणि तुम्हीच म्हणजे मराठी, तुम्ही म्हणजे मराठी आणि तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही. समोर बसलेली ही जनता म्हणजे मराठी आणि महाराष्ट्र आहे.

काल काही लोकांनी माझीच नक्कल केली. पण त्यांना समजायला पाहिजे की नक्कल करता करता काकांची काय परिस्थिती झाली. पण काकांना किमान नक्कल तरी करता येते. पण तुमची काय अवस्था होईल.

आधी म्हणायचे की हिंदी सक्तीसाठी आम्ही एकत्र आलो अन् आता काय तर आम्ही मराठीसाठी आणि मराठी माणसासाठी एकत्र आलो. या राज्यात हिंदी सक्ती करणारे कोण? 21 सप्टेंबरला उद्धव ठाकरे यांनी त्रिभाषा सूत्रावर माशेलकर समिती तयार झाली. या समितीत उबाठाचे नेते, विजय कदम देखील होते. या समितीत 18 लोक मराठी होते. आता या समितीचा अहवाल सर्वांनी पाहिला. पान नंबर 56 वर भाषेकरिता उपगट केला. त्यात उबाठाचे नेते विजय कदम होते. त्यात 'इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी' असे नमूद केले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांच्या काळातील आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले- आज जे मराठी माणसांच्या नावाने आवाज काढत आहेत. ते सुट्टीवर कुठे जातात हे तुम्हाला माहिती आहे. वादापेक्षा मराठी आमच्यासाठी मोठा आहे. मग वेगळे का झालात. त्यावेळी तुम्हाला बाळासाहेबांची स्वप्न पूर्ण करावीशी नाही वाटली का? तुम्ही स्वार्थासाठी वेगळे झालात अन् स्वार्थासाठीच एकत्र आलात हे मराठी माणसांना माहिती आहे. हे पुतणा-मावशीचं प्रेम आहे. त्यामुळे यांच्यापासून सावध होण्याची गरज आहे.

## अजित पवारांना सोलापुरात जोरदार झटका



**सोलापूर :** महापालिका निवडणुकीला अवघे २ दिवस शिल्लक असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसला सोलापुरात जोरदार झटका बसला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या येथील एका अधिकृत उमेदवाराने आज अचानक भाजपमध्ये प्रवेश केला. यामुळे शहराच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. या अनपेक्षित घटनेमुळे शहरातील एका प्रभागातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सोलापूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ ड मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार तुषार जक्का यांनी आज सोमवारी भाजपमध्ये प्रवेश केला. जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. सोलापूर महापालिकेसाठी येत्या १५ तारखेला मतदान होणार आहे. त्यापूर्वीच राष्ट्रवादीच्या उमेदवाराने पक्ष सोडल्यामुळे पक्षाच्या निवडणूक रणनीतीला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

प्रभाग क्रमांक ९ ड मध्ये यापूर्वी भाजपचे उमेदवार मेघनाथ येमूल, राष्ट्रवादीचे तुषार जक्का आणि शिवसेना ठाकरे गटाचे सुरेश गायकवाड यांच्यात तिरंगी लढत होती. राष्ट्रवादीकडून जक्का यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली होती. मात्र, त्यांनी ऐनवेळी भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे या प्रभागातील राजकीय समीकरणे पूर्णतः बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मतदानाच्या अगदी तोंडावर घडलेल्या या घटनेमुळे राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली असून पक्षाच्या प्रचारयंत्रणेला मोठा धक्का बसला आहे.

या पक्षांतरामुळे भाजपला मात्र मोठा फायदा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्थानिक पातळीवर प्रभाव असलेले उमेदवार भाजपमध्ये दाखल झाल्यामुळे भाजपची ताकद वाढल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे, शिवसेनेच्या ठाकरे गटापुढेही नव्या आव्हानांची निर्मिती झाली आहे.

सोलापूर महापालिकेची निवडणूक सध्या संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरली आहे. एकीकडे भाजपमध्ये काही ठिकाणी अंतर्गत नाराजी आणि बंडखोरीचे सूर उमटताना दिसत आहेत. तर दुसरीकडे, महाविकास आघाडीतही जागावाटपावरून मोठ्या प्रमाणात असंतोष पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी अधिकृत उमेदवारांच्या विरोधात बंडखोर उमेदवार मैदानात उतरले आहेत. गेल्या काही दिवसांत सकाळी एका पक्षात असलेले इच्छुक उमेदवार सायंकाळी दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचे चित्र सोलापुरात वारंवार पाहायला मिळाले. या सततच्या राजकीय उलथापालथींमुळे सामान्य मतदार मात्र गोंधळून गेला आहे. कोणता उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे, याबाबत मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

१०२ सदस्यीय सोलापूर महापालिकेसाठी होणाऱ्या या निवडणुकीत २०१७ मध्ये भाजपने ४९ जागा जिंकत सर्वाधिक यश मिळवले होते. त्यानंतर शिवसेनेला २१, काँग्रेसला ११, एमआयएमला ९, राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ ४, बसपला ४ आणि माकपला १ जागा मिळाली होती. त्या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला होता. यंदाच्या निवडणुकीत मात्र स्थानिक समीकरणे, पक्षांतर्गत बंडखोरी, ऐनवेळी होणारे पक्षांतर आणि मतदारांचा बदलता कल यामुळे निवडणूक अधिकच चुरशीची झाली आहे. राष्ट्रवादीच्या उमेदवाराच्या भाजप प्रवेशामुळे अजित पवार गटासमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, सोलापूर महापालिकेचा निकाल नेमका कुणाच्या बाजूने झुकणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६

## आरोग्यम् क्लिनिक, किनगाव राजा येथे जिजाऊ - सावित्रीबाई जयंतीनिमित्त मोफत हाड तपासणी शिबीर




**बुलढाणा (महेश मुंढे) :** दिनांक १२ जानेवारी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे सावित्रीबाई फुले जयंती ते राष्ट्रमाता माँ जिजाऊ जयंती निमित्त गेली दहा दिवस दसरात्रोत्सव सुरू आहे. त्या निमित्ताने माता सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या स्मृतींना उजाळा मिळावा व आपल्या परिसरातील व्याधीग्रस्त रुग्णांना मोफत आरोग्याची तपासणी करून मोफत औषधोपचार मिळावा या हेतूने डॉ.भुषण नागरे यांच्या आरोग्यम् क्लिनिक/दवाखाना हिवरखेड रोड किनगाव राजा येथे भव्य मोफत हाडांची (अर्थोपेडिक) तपासणी शिबीर संपन्न झाले. सावित्रीबाई फुले,जिजाऊ माँ साहेब तथा स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पुजन करून शिबिराचे औचारिक उद्घाटन किनगावराजा पोलिसस्टेशनचे ठाणेदार मा.संजय मातोंडकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरामध्ये परिसरातील 337 रुग्णांची तपासणी हुशेज् जालना हॉस्पिटल अंबड चौफुली जालना येथील प्रसिद्ध अर्थोपेडिक सर्जन डॉ.अमोल साळवे सर, डॉ.मुंढे सर यांनी तपासणी करून सर्वच रुग्णांना मोफत औषध-गोळ्या वाटप करून हाडांची ठीसुळता पाहण्यासाठी मोफत BMD टेस्ट करण्यात आली.यावेळी किनगाव राजा पोलीस स्टेशनचे API मा.शरद ठोंबरे साहेब, मा. मुंढे साहेब, मा.महेश मुंढे तथा जालना हॉस्पिटलचे मेडिकल स्टाफ उपस्थित होते. शेवटी आयोजक डॉ.भुषण नागरे, आरोग्यम् क्लिनिक किनगावराजा यांनी डॉ.अमोल साळवे सर, डॉ.मुंढे सर, त्यांचे सर्व सहकारी, किनगाव राजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा.मातोंडकर साहेब,API मा. शरद ठोंबरे साहेब तथा पोलीस स्टेशनचे कर्मचारी आणि परिसरातून आलेल्या सर्व रुग्णांचे तथा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी येथील आदिवासी भागातील पहिलीचा वर्ग वाऱ्यावर



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव केंद्रांतर्गत येणाऱ्या ठाकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक या शाळेत पाच शिक्षक कार्यरत आहेत त्यापैकी मुख्याध्यापकाकडे इयत्ता पहिलीचा वर्ग आहे.परंतु आज काही पालक या शाळेत वैयक्तिक कामासाठी गेले असता तेव्हा पालकांना मुख्याध्यापकच गायब असल्याचे निदर्शनास आले त्यावेळेस इयत्ता पहिलीच्या वर्गात गेलो असता तिथे मुलांचे भांडण धिंगामस्ती चालू होती व काही मुले बाहेर इकडे तिकडे फिरत होती त्यानंतर शाळेतील इतर शिक्षकांना विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की मुख्याध्यापक सरांनी आम्हाला काहीच सुट्टी विषयी कल्पना दिलेली नाही त्यानंतर केंद्रप्रमुखांना फोन करून विचारणा केल्यास त्यांनी सुद्धा सांगितले.की मला त्यांच्या संदर्भात काहीच माहिती नाही त्यांना विचारून तुम्हाला कळवतो असे सांगण्यात आले. या शाळेच्या मुख्याध्यापकांचा मनमानी कारभार चालू आहे त्यांच्या मनावर कधी पण सुट्टी मारायची आणि दुपारनंतर कधी पण निघून जायचं हे सर्व त्यांच्या मनाचा कारभार चालू आहे. मुख्याध्यापक का मनमानी करत आहेत? आदिवासी मुलांची काहीच काळजी नाही का? मग या मुख्याध्यापकांवर कायदेशीर कारवाई का करण्यात येऊ नये? की प्रशासनाची जाणून बुजून दखल घेत नाही अशी चर्चा ठाकरवाडीतील ग्रामस्थ करत आहेत विशेष म्हणजे एकीकडे महाराष्ट्र शासन आदिवासी मुलांसाठी विविध योजना राबवत आहे मग या अशा कामचुकार मुख्याध्यापकांमुळे आदिवासी मुलांचे भविष्य अंधारात जात आहे या शिक्षकांची या शाळेतून हकालपट्टी करा अशी मागणी गावकऱ्यांनी वारंवार केंद्रप्रमुखांकडे व ग्रामपंचायतकडे केली आहे असे जर होत नसेल आणि आमच्या पाल्यांचे भविष्य बरबाद करणाऱ्या शिक्षकांवर कारवाई न झाल्यास आम्ही विविध मार्गाने आंदोलनाची हत्यार उपसणार आहे या आंदोलनादरम्यान काय अनुचित प्रकार घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील.

## कन्नड तालुका क्रीडा संकुलास उपसंचालक शेखर पाटील यांची भेट; व्हॉलीबॉल व कुस्ती केंद्रांची पाहणी



**कन्नड (कृष्णा शिंदे) :** तालुका क्रीडा संकुल येथे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे उपसंचालक शेखर पाटील यांनी भेट दिली असता त्यांनी संकुल बाबत व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्र व कुस्ती प्रशिक्षण केंद्राला भेट दिली यावेळी तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य व मार्गदर्शक प्रवीण शिंदे यांनी त्यांचा सत्कार केला यावेळी तालुका क्रीडा संकुल समितीचे सदस्य डॉ उदय डोंगरे सव्वा निवृत्त क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे तालुका क्रीडा सहज मुक्तानंद गोस्वामी राष्ट्रीय खेळाडू विशाल दांडेकर उपस्थित होते



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६

## श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराची यशस्वी सांगता



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने मौजे कदेर येथे आयोजित "पाणलोट व्यवस्थापन आणि पडीक जमीन शाश्वत विकासासाठी युवक "हे विशेष शिबिर 06 जानेवारी ते 12जानेवारी 2026 दरम्यान यशस्वीपणे पार पडले. या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. किसान लोहार, प्रमुख पाहुणे श्रीमती विभावरीताई शाईवाले (अध्यक्ष,श्रीकृष्ण शिक्षण संस्था),सौ.मंदाकिनी ताई पाटील (सहसचिव,श्रीकृष्ण शिक्षण संस्था.)श्री. प्रल्हाद सूर्यवंशी (पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन , उमरगा.), डॉ. विनोदकुमार वायचळ, (व्यंकटेश महाविद्यालय, धाराशिव.),श्री. के. आर. स्वामी, श्री. सतीश जाधव(सरपंच, कदेर.),सौ. ए. एम. अबाचने (मुख्याध्यापक,जी.प. प्रशाला, कदेर) ,ग्रामविकास अधिकारी श्री.एम.एम.बिराजदार,पुंजरवाड साहेब,पोलिस पाटील श्री सुनील पाटील,टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.बाळासाहेब गायकवाड हे आवर्जून उपस्थित होते.यावेळी विविध वक्ते आणि प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले.प्रा.स्वामी यांनी विद्यार्थ्यांना उपदेश करताना राष्ट्रीय सेवा योजनेतून भरपूर कांहीं शिकायला मिळत असते.हे विविधांगी अनुभव आपल्याला पुढील आयुष जगण्यासाठी शिदोरी म्हणून उपयुक्त ठरतील असे सांगितले.कार्यक्रमाचे नियोजित वक्ते उपस्थित न राहू शकल्यामुळे श्री प्रल्हाद सूर्यवंशी यांचे प्रतिनिधी म्हणून प्रमुख पाहुणे म्हणून गजानन पुंजरवाड हे उपस्थित होते त्यांनीही श्रमदानाचे महत्त्व समजावून सांगितले.श्रमदान,अभ्यास आणि स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जा असे आवाहन केले.डॉ.विनोदकुमार वायचळ यांनीही आपले विचार विद्यार्थ्यांसमोर ठेवले.ग्रामविकास अधिकारी श्री एम.एम बिराजदार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून म्हणाले की.विद्यार्थ्यांनी हे जीवन मनसोक्तपणे जगले पाहिजे असे सांगून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना मोकळी वाट करून दिली पाहिजे.डॉ.विनोदकुमार वायचळ यांनी पाणी व्यवस्थापन अत्यंत महत्वाचे असून पाण्याचा प्रश्न वरचेवर गंभीर बनत चालला असून अनेकांनी पुढचे महायुद्ध हे पाण्यासाठी असेल असे सूतोवाच केलेले आहे.त्यामुळे पाणी सर्वांसाठीच महत्त्वाचे आहे.त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेतील अनेक ट्रिप्स सांगून विद्यार्थ्यांमध्ये चैतन्य फुलवले.त्यानंतर मौजे कदेर गावचे सरपंच श्री.सतीश जाधव यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.गेल्या सात दिवसात मौजे कदेर येथे संपन्न झालेल्या विविध उपक्रमांचा आढावा अत्यंत विस्तृतपणे कार्यक्रमाधिकारी डॉ.भाऊसाहेब उगले यांनी घेतला.दिनांक 7 जानेवारी 2026 ला "विकसित भारत आणि ग्रामस्वच्छतेमधे युवकांचे योगदान" या विषयावर प्रा. डॉ. एम. सी. खोत यांच्या अध्यतेखाली व प्रमुख पाहुणे डॉ. आर. एन निगडे यांचे बौद्धिक व्याख्यान झाले. तसेच 8 जानेवारीला डॉ. के. एस. लोहार यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख वक्ते डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांचे आपत्ती व्यवस्थापन या विषयावर व्याख्यान झाले. 9 जानेवारीला डॉ. डी. पी. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख वक्ते डॉ. महेश मोटे यांचे श्रद्धा व अंधश्रद्धा या ज्वलंत विषयावर प्रबोधन झाले. 10 जानेवारीला मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. आशिया चिश्ती यांचे अत्यंत आशयपूर्ण असे बालविवाह प्रतिबंध या विषयावर विश्लेषणात्मक व्याख्यान झाले. त्यानंतर 11जानेवारीला शेतकऱ्यासाठी आणि शेतीला पूरक असे पर्यावरणातील बदल व शेतीव्यवस्थापन या विषयावर प्रसिद्ध अभ्यासक प्रा. रामदास कोळी यांचे प्रदीर्घ व्याख्यान झाले, या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दस्तगीर पठाण हे उपस्थित होते. गेले सात दिवस अत्यंत भरगच्च उपक्रम, व्यस्त दिनचर्या विद्यार्थ्यांनी व्यतीत केली.या सबंध सात दिवसाच्या सेवा योजना विशेष शिबिरात अनेक विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या उपक्रमात आपला उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला. स्वच्छता मोहीम, जनजागृती, मौजे कदेर येथील ग्रामपंचायतीच्या समन्वयाने संपूर्ण गावाची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आहे. वृक्ष लागवड, झाडाना आळे करणे, प्रत्येक चौकातील घान काढून टाकणे, घरोघरी जाऊन कचरा आणि ई कचरा साफ करणे असे दैनंदिन श्रमदान आणि श्रमसंस्कार केले.दुपारच्या सत्रात सतत पाच दिवस बौद्धिक व्याख्यानात उत्साहाने आपला सहभाग नोंदवला.सूत्रसंचालन ,आभार आणि प्रास्ताविक विद्यार्थ्यांनी केले.शेवटी प्रभारी प्राचार्य डॉ.किसान लोहार यांनी अध्यक्षीय समारोप केला.विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व मनोगते व्यक्त केली.या सांगता समारंभाचे सविस्तर प्रास्ताविक व अहवालावाचन प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले यांनी केले.सूत्रसंचन प्रा. डॉ . मल्लमा आंबुसे,तर आभार प्रा.डॉ.बालाजी कोनाळे यांनी केले.राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## ज्ञानेश्वर गायके यांच्या पेरणी कवितासंग्रहास 'तिफण राज्यकाव्य पुरस्कार' प्रदान




**कन्नड (अरुण थोरात) :** भाषा साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण तर्फे कै. भिकाजीराव हुसे स्मृतिप्रीत्यर्थ तिफण राज्यकाव्य पुरस्कार सन २०२५-२६ हा मानाचा पुरस्कार कन्नड तालुक्यातील कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदानातून प्रकाशित झालेल्या' पेरणी' या कवितासंग्रहास मराठीतील प्रसिद्ध कविवर्य चित्रपट गीतकार नारायण सुमंत सोलापूर यांच्या शुभहस्ते पुरस्काराचे वितरण कन्नड जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील लोकनेते सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात राज्यस्तरीय कविता महोत्सवात करण्यात आले. डॉ. शिवाजी हुसे, संयोजक,भाषा साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कवी ज्ञानेश्वर गायके यांचे "पेरणी", "पारखं झालं गाव" आणि "माझ्या गावाची वाट" या तिन्ही कवितासंग्रहाचे मराठी साहित्यात स्वागत करताना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा देऊन भाषा साहित्य व संशोधन परिषदेला आपला सत्कार करताना आनंद होतोय अशा निखळ भावना व्यक्त केल्या. व्यासपीठावर प्रसिद्ध कवी राजेंद्र दिघे, प्राचार्य डॉ विजय भोसले, ॲड कृष्णा पाटील जाधव, डॉ अंबादास सगट, प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर, डॉ. रूपेश मोरे,महोत्सवाचे स्वागताध्यक्ष रामकृष्ण पवार, दिलीपकुमार सोनवणे (नायब तहसीलदार, कन्नड) व संयोजक तिफणकार प्रा. डॉ. शिवाजी हुसे होते. हा पुरस्कार मिळाल्या बद्दल डॉ. संजय गायकवाड, माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे, अरुण थोरात, प्रवीण दाभाडे, लक्ष्मण वाल्डे, सुरेश औटे, श्रीराम दापके, संदीप वाकडे, अनिता राठोड, शुभदा देवरे, केशरचंद राठोड, दत्ता मोरस्कर, संदीप ढाकणे, प्रकाश शहरवाले, गीतांजली गजबे, रामेश्वर मोरे, जगन्नाथ जाधव, सुभाष काळे, समाधान निकम, पूजा चव्हाण, दत्ता मोरस्कर, संकेत निकम,जनार्दन गोरे, मनोज खुटे, ब्रह्मगिरी गोस्वामीऋषिकेश आव्हाळे यांनी कवी ज्ञानेश्वर गायके यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता राठोड यांनी केले तर आभार युवा कवी बहुरंगीकार लक्ष्मण वाल्डे यांनी मानले.

## कालिकादेवी विद्यालयात,'जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद' यांची जयंती उत्साहात साजरी



**शिरूर कासार :** दि.१२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे 'राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद' यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.तहसीलदार मा.सुरेश घोळवे साहेब,गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब,पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी,प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेनं झाली.यावेळी तहसीलदार मा.सुरेश घोळवे साहेब यांनी आपल्या भाषणातून,राजमाता जिजाऊ माँ साहेब यांनी बाल शिवबाला बालपणापासूनच मानवतेची आणि सर्वधर्मसमभावाची शिकवण दिली. स्वराज्याबद्दलची संकल्पना बाल शिवबाला सांगून आपल्या स्वराज्याचे स्वप्न साकार करायला सांगितले.आणि शिवबाने हे महत्वपूर्ण कार्य पूर्णत्वास नेले.तर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी सांगितले की,माँ जिजाऊ म्हणजे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता नव्हे,तर त्या तमाम बहुजन समाजाच्या उत्कर्षाचे प्रतीक होत्या.तसेच त्यांचे आपल्या राष्ट्राविषयीचं उदात्त आणि सर्व समावेशक धोरण लक्षात घेण्यासारखे होते.तेव्हा राजमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस म्हणजे केवळ एक उत्सव म्हणून साजरा न करता मानवतावादाचा व सर्वधर्म समभावाचा गौरव दिन म्हणून साजरा व्हावा.अशी इच्छा व्यक्त केली.गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे साहेब यांनी स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्याचा इतिहास सांगितला, त्यानंतर शिरूर (कासार)पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा.धनंजय कुलकर्णी साहेब यांनी विद्यार्थ्यांना शिस्त व नियम या विषयीचे सविस्तर असे मार्गदर्शन केले,तर विद्यार्थी वक्ते चिं,शोएब शौकत आतार यांनी जिजाऊंच्या जीवनाविषयी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी उपप्राचार्य प्रा बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे, प्रा. महारूद्र डोंगरे, प्रा. नामदेव तरकसे,प्रा. अनिल जरे,प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा. सत्यनारायण ढवळे, प्रा. शशिकांत जावळे,प्रा.नारायण घोलप, प्रा. अशोक इनकर, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड,प्रा.दत्ता शिंदे, प्रा. बिभिषण घायाळ, प्रा. महादेव हांगे, प्रा. नारायण तांबे, प्रा. लक्ष्मण गव्हाणे, प्रा. दत्ता गायकवाड, डॉ. अशोक घोडके, प्रा.अशोक सवासे,प्रा.हनुमंत घायाळ,प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब,प्रा.सविता दराडे, प्रा. रेखा निर्मळ, प्रा.सीमा ढवळे,सौ.अनिता लाटे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,वसंत आहेर,जयेंद्र निकम,राजू बडे,आप्पासाहेब कांबळे,प्रशांत राऊत,नितीन बहिर,रोहित शिराळे,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.यावेळी विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६


## सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाच्या वतीने तालुकास्तरीय स्पर्धेला सुरुवात




**कन्नड (अरुण थोरात) :** सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, बाळासाहेब पवार फाऊंडेशन आयोजीत कन्नड तालुका स्तरीय बुद्धिबळ व बॅडमिंटन स्पर्धेस दि.१२ जानेवारी रोजी सुरुवात झाली आहे. स्पर्धेचे उद्‌घाटन क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवृत्त क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अभय आहेर, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उदय डोंगरे, तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी, डॉ. शिवाजी हुसे, राज्य पंच विलास राजपूत व प्रवीण शिंदे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.या स्पर्धा दि. १२ व १३ जानेवारी, दोन दिवस चालणार आहेत.या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालयाचे कर्मचारी अशोक काळे, नरेश सोनवणे, ऋषिकेश शिवदे, राहुल दनके, मुकेश राठोड आदींनी परिश्रम घेतले, यावेळी तालुक्यातील क्रीडा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यात शाम खोसरे, विशाल दांडेकर, राहूल दणके, प्रकाश मैद, कडुबा चव्हाण, शुभात भोजणे, दिनेश परदेशी, अनिस शेख यांचा बाळासाहेब वाचलनालयातर्फे सत्कार करण्यात आला. यासपर्धेत तीनशे विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

## जिंतूर ग्रामीण रुग्णालयात पत्रकार कुटुंबीयांसाठी मोफत आरोग्य तपासणी; ७४ रुग्णांची तपासणी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पत्रकारीतेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघ जिंतूर व ग्रामीण रुग्णालय जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार व त्यांच्या कुटुंबाचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर रविवार दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे उत्साहात संपन्न झाले.हे शिबिर माननीय जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार, अतिरिक्त जिल्हाशल्य चिकित्सक डॉ. सारिका बडे,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.कल्याण कदम व वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्‌घाटन पत्रकार कुटुंबातील शिवनंदा शिंदे सोसकर व बिलकिस बेगम सिद्दिकी यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय मस्के (ग्रामीण रुग्णालय जिंतूर), मा. शेख शकील अहमद (मार्गदर्शक, मराठी पत्रकार संघ), मा. बालाजी शिंदे (अध्यक्ष, अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघ जिंतूर), मा. सिराज सिद्दिकी (कार्याध्यक्ष), डॉ. ज्ञानेश्वर माघाडे (आर.पी. हॉस्पिटल परभणी), डॉ. नीरज मोरे (संजिवनी हॉस्पिटल जिंतूर) व डॉ. दिपा परिहार यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.शेख शकील अहमद यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. नीरज मोरे यांनी उपस्थित रुग्ण,पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ.आबासाहेब जाधव यांनी ग्रामीण रुग्णालय व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध आरोग्य सेवा, उपचार व निदानाबाबत सविस्तर माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एनसीडी समुपदेशक गणेश देशमुख यांनी केले.या शिबिरात डॉ. ज्ञानेश्वर माघाडे, डॉ. नीरज मोरे, डॉ. हेमंत भुत्ते व डॉ. प्रशांत बामणे यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ७४ रुग्णांची उच्च रक्तदाब, मधुमेह, ईसीजी तसेच इतर तपासण्या करून आवश्यक उपचार व निदान करण्यात आले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी व एनसीडी विभागातील किरण कदम, प्रेरणा किल्लारी, तसेच ग्रामीण रुग्णालय जिंतूर व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील डॉ. हेमंत भुत्ते, डॉ. प्रशांत बामणे, इनचार्ज सुजाता नाईक, किसनी सरकुंडे सिस्टर, शिंदे सिस्टर, नंदकिशोर लांडगे, विनोद राठोड, दत्ता काळे, दिलीप राठोड, विजयकुमार ढगे, अनंता जावळे, प्रतिक प्रधान, अनिल सावंत, विठ्ठल चव्हाण, हिंद लॅब जिंतूरचे पठाण सुफियान खान, पठाण शोएब खान यांच्यासह एनसीडी स्टाफ नर्स देविता राखोंडे, कक्षसेवक गंगाधर पालवे, गजानन धोत्रे, गजानन घुगे, मनोहर चाटे, बेले मावशी, सिमा कांगणे आदींनी मोलाचे परिश्रम घेतले.पत्रकार कुटुंबीयांसाठी आयोजित या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून समाजोपयोगी उपक्रम म्हणून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जगण्यातली अस्सल सल उजागर करणे म्हणजे कविता : डॉ प्रभाकर शेळके



**परभणी :** साहित्य सखा समूह,परभणी आयोजित “पहिले राज्यस्तरीय कविसंगम” काव्यसंमेलन दिनांक 11 जानेवारी 2026 रोजी उजळंबा येथील हॉटेल वसंत विलास रेस्टॉरंट येथे अत्यंत उत्साही आणि साहित्यिक वातावरणात पार पडले.या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून मा.श्री.सुभाष पांचाळ ( लोक कलावंत,परभणी ) हे उपस्थित होते. संमेलनाचे उदघाट्न मा.श्री.प्रा.डॉ.प्रभाकर शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या संमेलनाध्यक्षपदी मा. श्री. बा. बा. कोटंबे हे होते तर कविसंमेलननाचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. प्रा. डॉ. प्रल्हाद भोपे हे होते संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ.दत्ता शेषराव ठुबे (पाटोदकर) तसेच गंगाखेड येथील सुप्रसिद्ध कवयित्री देवकी कुलकर्णी उपस्थित होत्या. उदघाट्न प्रसंगी दिप प्रज्वलन व महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले या कविसंमेलनाचे प्रास्ताविक साहित्य सखाचे प्रमुख उध्दव परभणीकर यांनी केले. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक बा बा कोटूंबे "म्हणाले,आज कवितेचा आत्मा संवाद वाढल्याने कवितेचंगणगोत निर्मान करण्याचं काम साहित्य सखा समुहाच्या माध्यमातून होत असल्याचे दिसत आहे नवोदित कवींना प्रेरणा देण्याचे कार्य साहित्य सखा करत असल्याचे ते या वेळी म्हणाले तर उद्‌घाटक म्हणून डॉ प्रभाकर शेळके यांनी "जगण्यात टोचलं,बोचलं खुपलं ते सल होऊन अस्सल आलं की, कविता होते.आपली बोलीभाषा ही समृद्ध परंपरा आहे.माय मराठीचा जागर साहित्य सखा समुह करतो आहे.म्हणून आपल्या गाव शिवाराचे मातीचे ऋण कायमचं आहे "सारी मातीची लेकरं,माती होऊन जाणारं.श्वास पेरल्या देहात,माती अंनत अंबर" या विषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले यानंतर कवी संमेलन अतिशय बहारदार झाले कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.प्रल्हाद भोपे सर होते.या प्रसंगी माणिक पुरी यांनी परभणी जिल्ह्यातील साहित्य परंपरेचा गौरवांकित इतिहास मांडला.कवी मोहन कुलकर्णी,महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवींनी प्रेम, समाजभान, ग्रामीण वास्तव,स्त्रीवादी विचार, निसर्ग आणि समकालीन प्रश्नांवर आधारित राज्य भरातून आलेल्या कविंनी कविता सादर केल्या. कवी मोहन कुलकर्णी, कवी सचिन कमल गणपतराव मुळे ,परभणी,विद्रोही कवी कुंदन नंदा अवधूत, मानवत, कवी महारुद्र पोपडे, परभणी, कवी खेलबा काळे सर, माजलगाव गझलकारा सौ. अनुराधा वायकोस, परभणी,कवी चंद्रकांत नरटे सर, धाराशिव पिराजीपौत्र कवी दिनकर ए.गरुड, पिंगळीकर, कवयित्री सौ.दुर्गा देशमुख,परभणी,कवयित्री कु.बासुर्या वागतकर, नांदेड,कवी पाराजी टेकाळे,परभणी,कवयित्री शिवकन्या वसंत राठोड,औंढा नागनाथ,डॉ.विजयकुमार भिकूसिंग पवार,परभणी कवी अशोक दिपके,परभणी कवयित्री सौ.व्यंकनबाई परशुराम चेनलवाड ,परभणी,कवी लक्ष्मणसूत,वसमत कवी विलास जल्हारे,परभणी कवी दिपक मठपती,नांदेड कवी नितीन सूर्यवंशी,परभणी,कवी बबन शेळके,हिंगोली कवी रामकिशन कांबळे,पाथरी,कवी आबा पांचाळ, वसमत,कवी राजकुमार नायक, परभणी,कवी कमलाकर डुबे,परभणी,कवी कृष्णा भालेराव, नांदेड यांनी संमेलनात कविता सादर केल्या कवींच्या सशक्त शब्दांनी आणि प्रभावी सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. उपस्थित प्रेक्षकांनी टाळयांच्या कडकडाटात कवींना भर भरून दाद दिली. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. अनुष्का हिवाळे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन पांडुरंग वागतकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. विलास साखरे,कृष्णा भालेराव,यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## मतदानाचा हक्क

मतदानाचा हक्क तुला
संविधानाने मिळाले
मताच्या अधिकाराने
हक्क आपुले कळाले.

मतदान करतांना
आता द्यावे दे धक्का
भ्रष्टाचार रोखण्याचा
निर्धार कर तू पक्का.

समजून घे रे माणसा
मत आहे तुझी शक्ती
मतदानानेच करावे
भ्रष्टाचाराची मुक्ती.

आता सावध रहावे
येतील सारेच दारी
मत आपुले त्यांना द्यावे
लोकशाहीस जो तारी.

घरी येऊन ते म्हणतील
तूच लोकशाहीचा राजा
अक्कल हुशारीने आता
दाखवून द्यावी जागा.

सर्वांनी लक्षात ठेवावे
आपणच इथले राजे
डंका तुमच्या मताचा
महापालिकेत हो गाजे.

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क

एम.फिल-पी.एच.डी. थेसिस

मराठी, हिंदी, इंग्रजी

कलर प्रिंट स्कॅनिंग

झेरॉक्स

स्पायरल बायंडिग

लॅमिनेशन

थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103


# छत्रपती शिवाजी महाराज जातीयवादी नसून मानवतावादी - प्रा. शेख सुभान अली




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** छत्रपती शिवाजी महाराज हे जातीयवादी नसून मानवतावादी, लोककल्याणकारी आणि धर्मनिरपेक्ष राज्यकर्ते होते. स्वराज्याचा शत्रू तो कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा असो, त्याला शिक्षा झालीच पाहिजे, हीच शिवरायांची स्पष्ट भूमिका होती, असे प्रतिपादन प्रा. शेख सुभान अली यांनी केले.अखिल भारतीय तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जाहिर व्याख्यानात ते "छत्रपती शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था व आजचे राजकारण" या विषयावर बोलत होते. हे व्याख्यान दि. ८ जानेवारी रोजी जुनी कन्या शाळा मैदान,जिंतूर येथे पार पडले.सदरील कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख गटनेते सचिन गोरे, काँग्रेसचे गटनेते शेख इस्माईल, रा.कॉ.अ.प.गटाचे गटनेते अशोक बंड,अँड मनोज सारडा,रमेश दरगड, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अँड माधव दाभाडे,नगरसेवक अँड गोपाळ रोकडे,संदीप लकडे, टीका खान पठाण,प्रदीप चौधरी,महंमद अथर,अकबर कुरेशी,दत्ता कटारे,व्यापारी सत्यनारायण शर्मा,देवेंद्र भुरे,हरीश मुंदडा,मौलाना जलील,मुफ्ती मिर्झा बेग,खारी अहेमद रशीद,जेष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर,निहाल अहेमद,विजय चोरडिया,गजानन चौधरी,रत्नदीप कळमकर,किशोर देशपांडे,मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते यावेळी प्रा.शेख सुभान अली पुढे म्हणाले की,छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सर्व जाती-धर्मातील लोक एकत्र येऊन स्वराज्यासाठी काम करत होते. महाराजांनी जातीय समानतेचा पुरस्कार केला. त्यांच्या राज्यात कोणताही भेदभाव नव्हता.त्यामुळेच शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष आणि लोकाभिमुख होते.इतिहासाचा दाखला देताना त्यांनी सांगितले की,छत्रपती शिवाजी महाराजांवर पहिला वार करणारा कृष्णा कुलकर्णी हा होता.मात्र त्याची जात पाहून नव्हे,तर स्वराज्याचा शत्रू म्हणून त्याला शिक्षा देण्यात आली. यावरून महाराज न्याय देताना जाती-धर्माचा विचार करत नसत,तर केवळ स्वराज्याच्या हिताचा विचार करत असल्याचे स्पष्ट होते.आजच्या राजकारणावर टीका करताना त्यांनी म्हटले की,सध्या प्रत्येक जातीचे वेगवेगळे पक्ष निर्माण झाले आहेत. मात्र अशा जातीय राजकारणातून महाराष्ट्राचे हित कसे साधणार, हा खरा प्रश्न आहे. शिवाजी महाराजांच्या विचारांपासून आजचे राजकारण दूर जात आहे.शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलताना प्रा. शेख सुभान अली म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांचे खरे रक्षक होते. त्यांनी शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज देण्याची व्यवस्था केली होती. आज मात्र अनेक राजकारणी सहकारी बँका व जिल्हा बँकांच्या माध्यमातून आपल्या नातेवाईकांना कर्ज देतात आणि सामान्य शेतकरी वंचित राहतो, ही दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोया शेख यांनी केले तर आभार कार्याध्यक्ष सिराज सिद्दीकी यांनी मानलेकार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पत्रकार संघाचा पदाधिकारी सदस्यांनी प्रयत्न केले

# राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त माहितीपट प्रदर्शन





**जालना :** येथील बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक वारसा जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा उपक्रम इंग्रजी विभाग, गणित विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.या प्रसंगी विद्यार्थ्यांना शिवनेरी, जंजिरा व प्रतापगड या ऐतिहासिक किल्ल्यांवरील माहितीपट दाखविण्यात आले. माहितीपटातून छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेबांचे संस्कार, स्वराज्याची संकल्पना, तसेच किल्ल्यांचे ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व प्रभावीपणे उलगडून दाखविण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान, देशभक्ती व राष्ट्रीय मूल्यांची जाणीव निर्माण झाली.प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन प्रभारी प्राचार्य डॉ .भूषण नाफडे यांच्या हस्ते करण्यात आले.प्रास्ताविकात इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. विलास भुतेकर यांनी विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घ्यावी असे सांगितले. माहितीपट प्रदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करत कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी व ज्ञानवर्धक असल्याचे नमूद केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. क्षमा अनभुले, प्रा प्रियांका चौंडीये यांच्यासह विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा. संदीप पाटील यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६


## प्रतिभाताई-वत्सलाबाई पाटील शाळांत जिजाऊ, सावित्रीबाई व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त समाज परिवर्तन सप्ताह उत्साहात साजरा




**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा वत्सलाबाई पाटील माध्यमिक शाळेमध्ये राजमाता जिजाऊ . क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली दिनांक ३ जानेवारी ते १२ जानेवारी २०२६ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने समाज परिवर्तन सप्ताहाचे श्री शैलेंद्र पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करून विद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आणि या समाज परिवर्तनाच्या समारोप प्रसंगी दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांनी अध्यक्षपद भूषविले. छत्रपती संभाजी नगर पोलीस आयुक्त कार्यालयातील दामिनी पथकातील श्रीमती खरात मॅडम, श्री डोईफोडे सर, श्री पवार सर यांची सुद्धा उपस्थित होते. प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री ढमाले सर हे सुद्धा या कार्यक्रमाला उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून राजमाता जिजाऊ सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित विद्यार्थ्यांनी नाटिका सादरीकरण सुद्धा करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राजपूत सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती मोकासरे मॅडम यांनी केले.

## ज्ञानेश्वर विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** : बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालय येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे (भाऊ) सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांनी आणि वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली.मान्यवरांची उपस्थिती आणि प्रतिमा पूजनकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल पवार या होत्या. प्रमुख वक्ते म्हणून श्री. संतोष अधाने व श्री. रामेश्वर कोठुळे तसेच श्री. शहादेवराव खंडागळे यांची मंचावर सन्माननीय उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची दिमाखदार सुरुवात झाली. प्रेरणादायी व्याख्यानेकार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री. रामेश्वर कोठुळे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांची आजच्या तरुणाईला असलेली गरज अधोरेखित केली. तर श्री. संतोष अधाने यांनी राजमाता जिजाऊंचे जीवन चरित्र मांडताना, त्यांनी शिवरायांवर केलेले संस्कार आणि स्वराज्य निर्मितीतील त्यांचे योगदान यावर सविस्तर भाष्य केले.विद्यार्थ्यांचा कलाविष्कार आणि स्पर्धाडॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. यावेळी: * वक्तृत्व: विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या विचारांवर प्रभावी भाषणे केली. * सांस्कृतिक कार्यक्रम: शिवरायांच्या जीवनावर आधारित पोवाडे आणि स्फूर्तीदायक नृत्यांनी सभागृह दुमदुमून गेले.सूत्रसंचालन व आभार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शरयू बोरगावकर यांनी अत्यंत नेटकेपणाने केले, तर शेवटी डॉ. रवींद्र साठे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांना "नॅशनल आयडियल टीचर" पुरस्कार जाहीर



**जालना (प्रतिनिधी)** : जेईएस महाविद्यालय जालना, यांना बी. जे. फाउंडेशन ट्रस्ट मुंबईतर्फे यंदाचा "नॅशनल आयडियल टीचर" (राष्ट्रीय आदर्श शिक्षक) पुरस्कार जाहीर झाला असून, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक १०३०वाजता आयोजित कार्यक्रमात परेल ,मुंबई येथील "महात्मा फुले महाविद्यालयात" माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांच्या हस्ते देण्यात येणार आहे. प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक च्या अभ्यास केंद्रामार्फत अनेक गरीब, गरजू विद्यार्थ्यांना पदवीपर्यंतचे शिक्षण घेण्यास मदत केली आहे. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गेल्या २२ वर्षापासून ते कार्यक्रमाधिकारी असून जिल्हा समन्वयक तसेच आता विभागीय समन्वयक छत्रपती संभाजी नगर येथे या पदावर ते काम करत असून,अनेक गावांमध्ये स्वच्छता निर्मूलनाचे, वनराई बंधारे तसेच सांडपाणी व्यवस्थापन साठी शोष खड्डे चे कार्य राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून करून घेतले आहे. मराठी विषयाचे परीक्षक , मॉडेटर, चिपमॉडेटर तसेच पेपर सेटर , वेगवेगळ्या परीक्षांचे परीक्षा केंद्र संचालक. आदी, पदांवर त्यांनी कार्य केलेले आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांच्या विद्यार्थ्यांसाठी कॉन्सिलर म्हणूनही काम करतात. जालन्यातील पोलीस प्रशिक्षण विद्यालय, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र तसेच वन प्रबोधिनी या प्रशिक्षण संस्थांमध्ये गेस्ट लेक्चरर म्हणून कार्य करतात. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा प्रचार व प्रसार समितीवर ते सदस्य म्हणून कार्यरत आहेत., राज्य शासनाच्या माहिती विभागाच्या कलापथक निवड समितीवर सदस्य व वृद्ध कलावंत निवड समितीवर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांची जवळपास शिक्षण क्षेत्रात अध्यापक म्हणून ३१वर्ष सेवा झाली आहे, गरीब विद्यार्थ्यांविषयी त्यांच्या मनात तळमळ, निशुल्क मार्गदर्शन करण्याची तयारी तसेच पत्रकारिता करून समाजसेवा चा ध्यास घेतला आहे.अतिशय गरिबीच्या प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत, आज येथपर्यंतचा प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी प्रवास केलेला आहे, यामध्ये परिवारातील सदस्य पत्नी सौ.सुनीता,व मुलीं डॉ.हर्षला, व डॉ.श्वेता यांचा सहभाग असल्याचा ते सांगतात.एकंदरीत त्यांच्या या सेवेचा गौरव म्हणून त्यांना यंदाचा "नॅशनल आयडियल टीचर" चा हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्काराचे श्रेय ते जेईएस महाविद्यालयाला, मॅनेजमेंटला देत असल्याचे सांगतात, त्यांनी मोकळीक दिल्यामुळेच आपण हे कार्य करू शकलो असेही सांगायला ते विसरत नाहीत. जालन्यातील प्रतिष्ठित नागरिक श्री.ज्ञानदेवराव पायगवहाने, श्री. खडके अण्णा, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी खासदार रावसाहेब पाटील दानवे, माजी आमदार अरविंदराव चव्हाण, श्री भास्कर आबा पाटील दानवे, डॉ.सुभाष पाटील, तसेच श्रीकृष्ण नगर मधील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १३ जानेवारी २०२६

# सोशल मीडियाच्या युगातील विवेकानंद

आजचा काळ हा सोशल मीडियाचा आहे. स्मार्टफोनच्या पडद्यावर जग सामावले आहे. संवाद सुलभ झाला आहे, अभिव्यक्तीला नवे व्यासपीठ मिळाले आहे आणि माहिती क्षणात उपलब्ध होते. तरीही या 'जोडलेल्या' जगात माणूस अधिकच एकाकी, अस्वस्थ आणि तणावग्रस्त होत चालला आहे. सतत ऑनलाइन असूनही मन मात्र अंतर्मुख होण्यास वेळ शोधत आहे. 'लाइक्स', 'फॉलोअर्स' आणि 'व्ह्यूज' यांच्या आकड्यांमध्ये आत्ममूल्य शोधण्याची धडपड वाढताना दिसते. अशा वेळी स्वामी विवेकानंद यांची जयंती आपल्याला आत्मपरीक्षणाची संधी देते. विवेकानंद म्हणजे केवळ संन्यासी किंवा ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नव्हे, तर आत्मविश्वास, विवेक आणि निर्भयतेचा जिवंत विचार आहेत. त्यांनी ज्या युवकांना "उठा, जागे व्हा" असा संदेश दिला, तो युवक आजही अस्तित्वात आहे—फक्त त्याच्या हातात मशाल ऐवजी मोबाइल आहे. बाह्य साधनांनी सक्षम झालेला, पण अंतर्गत स्थैर्य शोधणारा हा आजचा युवक विवेकानंदांच्या विचारांकडे नव्याने पाहण्याची गरज आहे.विवेकानंदांचा मूलमंत्र : आत्मविश्वास स्वामी विवेकानंद यांचा जीवनप्रवास आत्मविश्वासाचा उत्तम उदाहरण आहे. त्यांचे विचार हे केवळ धार्मिक किंवा तात्त्विक नव्हते; ते व्यावहारिक, जीवनाला दिशा देणारे आणि प्रत्येक युवकासाठी मार्गदर्शक ठरणारे होते. त्यांचा मूलमंत्र म्हणजे "स्वतःवर विश्वास ठेवा". ते म्हणायचे, "तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवला नाही, तर जगावर ठेवण्याचा अधिकार नाही." हा संदेश आजच्या डिजिटल युगातील युवकांसाठी अगदी प्रासंगिक आहे. आजचा युवक सोशल मीडियाच्या जागतिक कनेक्टिव्हिटीमध्ये बुडाला आहे. परंतु त्याचा आत्मविश्वास अनेकदा 'लाइक्स', 'फॉलोअर्स' किंवा इतरांच्या यशाशी तुलना यावर अवलंबून असतो. जेव्हा मनावर नियंत्रण नसते, तेव्हा बाह्य मान्यतेवर आधारित आत्ममूल्य फक्त तात्पुरते समाधान देऊ शकते. विवेकानंदांचा आत्मविश्वास अंतःकरणातून जन्माला येणारा असतो; तो कोणत्याही परिस्थितीत टिकतो, कोणत्याही दबावाखाली ढळत नाही. उदाहरणार्थ, शिकागो धर्मपरिषदेतील त्यांचा प्रवचन विचार करा. एका अनोळखी देशात, अनोळखी लोकांच्या समोर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांच्यात एक क्षणही संकोच नव्हते. आत्मविश्वासामुळेच त्यांनी संपूर्ण विश्वाला भारतीय संस्कृती आणि युवा शक्तीचे महत्त्व सांगू शकले. आजच्या युवकांनी या आत्मविश्वासाची शिकवण आत्मसात केली पाहिजे. सोशल मीडियावर दिसणारी चमक किंवा लोकप्रियता ही असली ताकद नाही; खरी शक्ती ही अंतर्मनाच्या स्थैर्यात आणि स्वतःवर दृढ विश्वास ठेवण्यात आहे. विवेकानंदांचा मूलमंत्र सांगतो — भीती दूर करा, स्वतःवर विश्वास ठेवा आणि आपली उर्जा योग्य दिशेने वापरा.सोशल मीडिया आणि आत्मप्रतिमा: सोशल मीडियाने आजच्या युवकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, X (पूर्वी ट्विटर), टिक टॉक यासारख्या प्लॅटफॉर्मवर प्रत्येकजण स्वतःची जीवनगाथा, यश आणि अनुभव 'परफेक्ट' स्वरूपात सादर करतो. या डिजिटल जगात युवकांना सतत तुलना करण्याची संधी मिळते: "तो कसा यशस्वी आहे, ती किती सुंदर दिसते, माझे फोटो कोणी किती लाईक करतात?" या तुलनेत स्वतःला कमी लेखण्याची वृत्ती वाढते, ज्यामुळे आत्मप्रतिमेवर गंभीर परिणाम होतो.स्वामी विवेकानंदांचा दृष्टिकोन या संदर्भात अत्यंत स्पष्ट आहे. ते म्हणायचे, "तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवत नाही, तर जग कधीच ठेवणार नाही." आत्मविश्वास हा अंतर्मनातून जन्माला येतो, बाह्य मान्यतेवर अवलंबून नसतो. सोशल मीडियावर असलेली आभासी चमक अनेकदा तात्पुरती समाधान देऊ शकते, पण अंतर्मनाची खरी शक्ती वाढवत नाही. उदाहरणार्थ, एखादा युवक दररोज अनेक फोटो पोस्ट करतो, परंतु तो स्वतःच्या क्षमतांवर आत्मविश्वास गमावतो. विवेकानंदांच्या शिकवणीनुसार, आत्मप्रतिमा ही इतरांच्या तुलनेवर नव्हे, तर स्वतःच्या प्रगतीवर आधारित असावी. युवकांनी सोशल मीडिया वापरून प्रेरणा घेता येते, ज्ञान मिळवता येते, पण स्वतःच्या मूल्यांवर आणि चारित्र्यावर विश्वास टिकवणे हे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. शेवटी, सोशल मीडियाचे साधन म्हणून लाभ घ्या, पण आत्मप्रतिमा टिकवण्यासाठी अंतर्मुख अभ्यास, ध्यान आणि स्वतःचा आत्मविश्वास जपणे गरजेचे आहे.अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि विवेक: सोशल मीडियाच्या युगात प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे अगदी सोपे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. ट्विटर, इन्स्टाग्राम किंवा व्हॉट्सअ‍ॅपवर तरुण क्षणात आपली मते, प्रतिक्रिया किंवा भावना शेअर करतात. हे स्वातंत्र्य खूपच मोलाचे आहे; परंतु त्यासोबत जबाबदारी आणि विवेक असणे अत्यंत गरजेचे आहे. अनेकदा अनियंत्रित पोस्ट, चुकीची माहिती किंवा द्वेषपूर्ण कमेंट्स युवकांच्या मानसिक आरोग्यावर आणि समाजावर गंभीर परिणाम करतात. स्वामी विवेकानंद यांच्या शिकवणीनुसार, निर्भय व्हा, पण विवेकी राहा. अभिव्यक्ती फक्त व्यक्त करण्यासाठी नाही; ती समाज, संस्कार आणि सत्य यांशी सुसंगत असावी. उदाहरणार्थ, एखाद्या युवकाने एखाद्या अफवा पोस्ट करून सामाजिक गोंधळ निर्माण केला, तर तात्पुरते स्वतःला लोकप्रिय वाटेल, पण त्या वर्तनामुळे इतरांवर होणारा परिणाम आणि आपली मानसिक शांती दोन्ही धोक्यात येतात. विवेकानंदांच्या दृष्टिकोनातून, शब्द हे शक्तिशाली आहेत; त्यांचा वापर समाज बांधण्यासाठी आणि प्रेरणा देण्यासाठी करावा. आजच्या युवकांसाठी मार्गदर्शन असावे असे म्हणायचे झाल्यास, सोशल मीडियावर व्यक्त होण्यापूर्वी विचार करणे, सत्य तपासणे आणि सकारात्मक संदेश पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. विवेकानंदांचा संदेश स्पष्ट आहे: स्वातंत्र्याचा अर्थ केवळ बोलणे नाही, तर बोलताना विवेक आणि चारित्र्य टिकवणे ही खरी ताकद आहे.धर्म, श्रद्धा आणि सोशल मीडिया: सोशल मीडियाच्या युगात धर्म आणि श्रद्धेचा प्रसार अतिशय सोपा झाला आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअ‍ॅपवरील ग्रुप्स आणि पोस्टद्वारे प्रत्येकजण आपल्या धार्मिक विचारांना प्रकट करतो, पूजा-पद्धती शेअर करतो, सत्कार्याचे अनुभव सांगतो किंवा धार्मिक संदेश प्रसारित करतो. ही क्षमता खूप उपयुक्त ठरते, परंतु त्यासोबत अफवा, कट्टरता आणि भावनिक प्रतिक्रिया यांचा धोका वाढतो. चुकीची माहिती, वैचारिक भिन्नता न समजणे किंवा धार्मिक द्वेष पसरवणे यामुळे समाजात तणाव निर्माण होऊ शकतो. स्वामी विवेकानंद यांच्या दृष्टिकोनातून धर्म म्हणजे माणूस माणसाला जोडणारे साधन, न कि विभाजक शक्ती. त्यांनी "सर्वधर्मसमभाव" या तत्त्वाचे पालन केले आणि शिकवले की धर्माची खरी ताकद व्यक्तिमत्त्व सुधारण्यात, समाज बांधण्यात आणि सेवा करण्यामध्ये आहे. आजच्या डिजिटल युगात युवकांनी हे समजणे आवश्यक आहे की धार्मिक पोस्ट, संदेश किंवा चर्चा केवळ भावनांपुरती मर्यादित नसावी; ती सत्य, सहिष्णुता आणि मानवसेवेच्या मूल्यांशी जुळलेली असावी. उदाहरणार्थ, एखादा युवक धार्मिक अफवा पोस्ट करून प्रसिद्धी मिळवू इच्छितो; मात्र त्या कृतीमुळे समाजात भीती किंवा वैमनस्य निर्माण होऊ शकते. विवेकानंदांचा संदेश स्पष्ट आहे — धर्माचे पालन अंतर्मुख, सकारात्मक आणि समाजहितासाठी असावे, सोशल मीडियावर धर्म व्यक्त करताना विवेक आणि जबाबदारी ठेवणे हे अत्यंत आवश्यक आहे.राष्ट्रप्रेम : ट्रेंड की तपश्चर्या? सोशल मीडियाच्या युगात राष्ट्रप्रेमाचा अर्थ बदलला आहे. अनेक युवक फेसबुक, इन्स्टाग्राम किंवा ट्विटरवर राष्ट्रीय ध्वजाचे फोटो, हॅशटॅग किंवा व्हिडिओ शेअर करून देशभक्ती व्यक्त करतात. मात्र, खरा प्रश्न असा आहे की हे फक्त ट्रेंड म्हणून आहे का, की खरी तपश्चर्या आणि जबाबदारीही आहे?स्वामी विवेकानंद यांच्या दृष्टीने राष्ट्रप्रेम म्हणजे फक्त घोषणा किंवा पोस्ट नव्हे, तर सेवा आणि कर्तव्य होय. गरीब, वंचित, दुर्बल आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करणे हे खरे देशभक्तीचे प्रतीक आहे. सोशल मीडियावरचे खरे राष्ट्रप्रेम हे फक्त लाइक किंवा शेअर मिळवण्यासाठी नसावे, तर प्रत्यक्ष कृतीतून समाज बदलण्यासाठी असावे. आजच्या युवकांनी लक्षात घ्यायला हवे की डिजिटल पोस्टमुळे जरी क्षणिक लोकप्रियता मिळाली तरी खरी राष्ट्रभक्ती ही कर्तृत्व, चारित्र्य आणि समाजसेवेतून ओळखली जाते.युवक आणि वेळेचे व्यवस्थापन: आजच्या डिजिटल युगात युवक सतत ऑनलाइन राहतात. सोशल मीडिया, गेमिंग, व्हिडिओ स्ट्रिमिंग, नोटिफिकेशन्स यामध्ये वेळ घालवणे सहज झाले आहे. त्यामुळे अभ्यास, व्यायाम, सामाजिक कार्य आणि आत्मविकासासाठी वेळ कमी पडतो. सतत तंत्रज्ञानाच्या आकर्षणात अडकलेल्या युवकांच्या मनाची एकाग्रता कमी होत चालली आहे, आणि मानसिक अस्वस्थतेचा धोका वाढत आहे. स्वामी विवेकानंद यांच्या दृष्टिकोनातून, वेळेचे व्यवस्थापन म्हणजे केवळ वेळेवर काम करणे नाही, तर मनाचे नियंत्रण आणि प्राधान्य निश्चित करणे होय. त्यांनी नेहमीच सांगितले की "योग्य साधना, अभ्यास आणि सेवा या गोष्टींमध्ये वेळ वितरित करणे अत्यंत आवश्यक आहे." उदाहरणार्थ, एखादा युवक दिवसभर सोशल मीडियावर व्यस्त राहतो, पण स्वतःच्या स्वप्नांकडे आणि कौशल्य विकासाकडे दुर्लक्ष करतो. यामुळे दीर्घकालीन यश आणि समाधान गमावले जाते. युवकांनी दिवसाचे नियोजन करताना प्राथमिकता निश्चित करणे, डिजिटल साधनांचा मर्यादित वापर आणि स्वतःसाठी मनाच्या शांतीसाठी वेळ राखणे गरजेचे आहे. विवेकानंदांचा संदेश स्पष्ट आहे — सतत व्यस्त राहणे महत्वाचे नाही, योग्य वेळेत योग्य काम करणे महत्वाचे आहे.तंत्रज्ञान : साधन की साध्य? सोशल मीडिया, स्मार्टफोन आणि इंटरनेट या तंत्रज्ञानाने आजचा युवक अत्यंत सुलभतेने ज्ञान, संवाद आणि माहिती मिळवू शकतो. मात्र, अनेकदा हे साधन लक्ष्य नव्हे, लक्ष्य गमावण्याचे कारण बनते. एखादा युवक सतत ऑनलाईन राहतो, परंतु स्वतःच्या कौशल्यविकास, अध्ययन आणि समाजसेवेपासून दूर जातो. स्वामी विवेकानंदांच्या दृष्टिकोनातून, तंत्रज्ञान हे साधन आहे, साध्य नाही. त्याचा वापर ज्ञान, प्रेरणा आणि सामाजिक कार्यासाठी करणे आवश्यक आहे, नाहीतर ते गुलामगिरीची जाळी बनते. युवकांनी तंत्रज्ञानावर नियंत्रण ठेवून त्याचा सकारात्मक वापर करणे शिकणे गरजेचे आहे.एकाकीपणा आणि मानसिक आरोग्य: सोशल मीडियाच्या युगात युवक सतत ऑनलाइन जोडलेले असतात, तरीही अनेकांना अंतर्मुख एकाकीपणा जाणवतो. ऑनलाईन मित्र असले तरी प्रत्यक्ष संवाद, खरे अनुभव आणि मानसिक आधार याची कमतरता भासते. सतत तुलना, अफवा, आणि लाइक/फॉलोअरवर अवलंबून राहणे मानसिक तणाव, नैराश्य आणि असुरक्षितता वाढवते. स्वामी विवेकानंद यांच्या शिकवणीनुसार, स्वतःला ओळखणे आणि आत्मसंयम ठेवणे हे मानसिक स्थैर्यासाठी आवश्यक आहे. त्यांनी माणूस केवळ बाह्य साधनांनी नव्हे, तर अंतर्मनाची शक्ती आणि मानवसेवा यामुळे बलवान बनतो असे सांगितले. ध्यान, साधना आणि समाजसेवा हे एकाकीपणा दूर करण्याचे प्रभावी मार्ग आहेत.आजच्या युवकांनी डिजिटल जगात वेळ घालवताना स्वतःसाठी वेळ राखणे, मनाचे आरोग्य जपणे, सामाजिक संवाद साधणे आणि आत्मविकासासाठी नियमित साधना करणे गरजेचे आहे. विवेकानंदांचा संदेश स्पष्ट आहे — मानसिक स्वास्थ्याशिवाय खरे यश साध्य होत नाही.सोशल मीडियावरचा आदर्श युवक: सोशल मीडियाचा प्रभाव आजच्या युवकांच्या जीवनावर खोलवर पडला आहे. प्रत्येकजण वेगवेगळ्या व्यासपीठावर आपले विचार, अनुभव आणि यश व्यक्त करतो. या युगात आदर्श युवक म्हणजे जो फक्त ऑनलाइन लोकप्रियता न शोधता, तर सकारात्मक संदेश आणि प्रेरणा प्रसारित करतो. स्वामी विवेकानंदांच्या शिकवणीनुसार, आदर्श युवक आत्मविश्वासी, निर्भय आणि विवेकी असतो. तो आपली ओळख केवळ डिजिटल फॉलोअर्सवर किंवा लाइक्सवर आधारित ठेवत नाही; त्याचे मूल्य, चारित्र्य आणि कृती हे त्याचे खरी ताकद असते. उदाहरणार्थ, एखादा युवक सोशल मीडियावर ज्ञानवर्धक लेख, समाजसेवेची प्रेरणा किंवा मानसिक आरोग्याबद्दल मार्गदर्शन शेअर करतो, तर तो फक्त लोकप्रिय होण्यासाठी नव्हे, तर समाजासाठी मूल्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो. आदर्श युवक सतत शिकतो, आपले कौशल्य विकसित करतो आणि वेळेचे व्यवस्थापन करत स्वतःच्या जीवनासोबत इतरांना जोडतो. तो सोशल मीडिया साधन म्हणून वापरतो, गुलामगिरीसाठी नव्हे. विवेकानंदांचा संदेश लक्षात घेता, युवकांनी डिजिटल जागतिकीकरणातही अंतर्मनाची शक्ती, चारित्र्य आणि मानवतेची जाणीव जपणे गरजेचे आहे, म्हणजेच हा आदर्श युवक खऱ्या अर्थाने समाजास मार्गदर्शन करू शकतो.विवेकानंद आज असते तर… (काल्पनिक संवाद)कल्पना करा, आज स्वामी विवेकानंद आपल्या विचारांसह सोशल मीडियाच्या युगात आले असते. त्यांनी युवकांकडे पाहून विचारले असते: "तुम्ही दिवसभर ऑनलाइन राहता, अनेक लाइक्स आणि फॉलोअर्स मिळवता, पण स्वतःच्या क्षमतांचा शोध घेतला का?"ते सांगितले असते की, "लाइक्स मोजू नका, मूल्य जपा. लोकप्रियता क्षणिक आहे, पण चारित्र्य आणि आत्मविश्वास कायमचा बळ देतात."विवेकानंद म्हणाले असते की युवकांनी सतत तुलना करणे बंद करावे. "तुमची ओळख तुमच्या चारित्र्यावर ठरते, दुसऱ्यांच्या यशावर नव्हे," असे त्यांनी स्पष्ट केले असते.तसेच त्यांनी युवांना डिजिटल साधनांचा योग्य उपयोग करण्यास उद्बोधित केले असते. "सोशल मीडिया हे साधन आहे, साध्य नाही. त्याचा वापर ज्ञान, समाजसेवा आणि सकारात्मक बदलासाठी करा, गुलामगिरीसाठी नाही," असे ते म्हणाले असते. मन आणि आत्म्याच्या बळावर त्यांनी हा संदेश दिला असता की, "स्वतःला ओळखा, ध्यान करा, समाजसेवा करा. स्क्रीनच्या पलीकडे खरे जीवन आहे." आजच्या युवकांनी विवेकानंदांचे हे विचार लक्षात ठेवले, तर लाइक्स, ट्रेंड्स आणि आभासी यशाच्या मागे न धावता, खरी स्वतःची ओळख आणि शक्ती शोधता येईल.विवेकानंद आज असते तर त्यांचे शब्द असेच होते — "भीती दूर करा, स्वतःवर विश्वास ठेवा, आणि आपली उर्जा योग्य दिशेने वापरा."आजच्या युवकांसाठी बोध: सोशल मीडियाच्या युगात युवक सतत डिजिटल गोंधळात अडकलेले दिसतात. सतत लाइक्स, फॉलोअर्स, व्ह्यूज आणि ट्रेंड्सवर अवलंबून राहणे आत्मविश्वासाला धक्का देऊ शकते. स्वामी विवेकानंदांच्या शिकवणीनुसार, युवकांनी आपले मूल्य बाह्य मान्यतेवर नव्हे, तर अंतर्मनाच्या शक्तीवर ठरवावे. प्रत्येक पोस्ट, हॅशटॅग किंवा डिजिटल ट्रेंडमुळे आत्ममूल्य मोजू नये; खरी ताकद म्हणजे स्वतःच्या क्षमतांवर, चारित्र्यावर आणि विचारांवर विश्वास ठेवणे. युवकांनी लक्षात ठेवावे की सोशल मीडिया हे केवळ साधन आहे, साध्य नाही. या साधनाचा योग्य वापर ज्ञान मिळवण्यासाठी, प्रेरणा देण्यासाठी आणि समाजसेवेसाठी करावा. लाइक आणि शेअरमुळे खरा बळ निर्माण होत नाही; त्यासाठी कृतीतून समाजात बदल करणे आवश्यक आहे. विवेकानंद सांगतात की कर्तृत्व, अध्ययन, साधना आणि सामाजिक योगदान हेच खरे राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीचे प्रतीक आहेत.तसेच, वेळेचे व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य हे आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्वाचे आहे. सतत ऑनलाईन राहणे आणि स्क्रीनवर व्यस्त राहणे यामुळे एकाकीपणा, नैराश्य आणि मानसिक तणाव वाढतो. विवेकानंदांच्या शिकवणीनुसार, ध्यान, आत्मचिंतन, सामाजिक कार्य आणि शिस्तबद्ध जीवन हे मानसिक स्थैर्य आणि संतुलन राखण्याचे मार्ग आहेत. शेवटी, युवकांनी लक्षात ठेवावे की स्वतःला ओळखणे, आत्मविश्वास टिकवणे, विवेकपूर्ण अभिव्यक्ती करणे आणि डिजिटल साधनांचा सकारात्मक वापर करणे हेच खरे यशाचे मापन आहे. सोशल मीडियाचा प्रभाव स्वीकारून, विवेक आणि चारित्र्य जपल्यास युवक केवळ लोकप्रियता नव्हे, तर समाजाला मार्गदर्शन देणारे आदर्श नागरिक बनू शकतात.



**लेखक डॉ नामदेव (देवा) वैजनाथ कचरे**
भूगोलशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.